RNI No. MAHBIL /2012/46121

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष १०, अंक ६८(४)] शुक्रवार, ऑक्टोबर ११, २०२४/आश्विन १९, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक ११०

**प्राधिकृत प्रकाशन**

### लवाद यांचे कार्यालय

**नगररचना परियोजना, नैना क्र. १२**

(चिंचवली तर्फ वाजे, कोंडले, महालुंगी, मोरवे, रितघर, उमरोली, उसर्ली बु. आणि वाकडी)

नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**जाहीर सूचना**

(महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम, १९७४ च्या नियम क्र. १३(१) अन्वये)

क्रमांकः लवाद / नरयो-१२/ सर्वसाधारण /२०२४/०१, दिनांक ३ ऑक्टोबर २०२४

ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या पनवेल तहसिलमधील उल्लेखिलेल्या गावातील काही भागात प्रारूपनगररचना परियोजना, नैना क्र. १२ (चिंचवली तर्फ वाजे, कोंडले, महालुंगी, मोरवे, रितघर, उमरोली, उसर्ली बु. आणि वाकडी) ही उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी नगरविकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस/१८१७/९७३/प्र.क्र. १०३/१७/नवि १३, दिनांक १३ सप्टेंबर २०१७ अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८ च्या पोट-कलम २ अन्वये त्यांची अधिसूचना क्र. सिडको/नैना/न.र.यो. १२/प्रा.यो./२०२४/१०५, दिनांक ८ जुलै २०२४ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त अधिसूचना ही **महाराष्ट्र शासन राजपत्राच्या** असाधारण भाग २ मध्ये दिनांक ९ जुलै २०२४ रोजी प्रसिद्ध झालेली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगरविकास विभागाने अधिसूचना क्र. टीपीएस/१२२४/१३४३/प्र. क्र.७८/२४/नरयो १२, दिनांक ७ ऑगस्ट २०२४ अन्वये श्री. एस. व्ही. सुर्वे, निवृत्त उप संचालक नगररचना यांची नेमणूक महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ७२ च्या पोट-कलम (१) प्रमाणे उक्त मंजूर प्रारूप नगररचना परियोजना नैना, क्र. १२ साठी लवाद म्हणून केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम, १९७४ च्या नियम क्र. १३ (१) अन्वये लवादाने जाहीर नोटीस प्रसिद्ध करून लवादाने त्याचे कामकाज केव्हांपासून सुरू केलेले आहे हे उक्त परियोजनेत समाविष्ट केलेल्या जागांच्या मालकाना कळविणे आवश्यक आहे म्हणून मी निम्नस्वाक्षरीकार लवाद महाराष्ट्र नगररचना परियोजना नियम, १९७४ च्या नियम क्र. १३ (१) प्रमाणे या नोटीसीद्वारे असे जाहीर करतो की उक्त नगररचना परियोजना, नैना क्र. १२ ची लवादीय कर्तव्ये पार पाडण्यास दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ पासून सुरुवात केली आहे.

सर्व जमीन मालक किंवा हितसंबंधीत व्यक्ती, ज्यांच्या जागा उक्त मंजूर प्रारूप परियोजनेत समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत त्यांना सुनावणी देणेसाठी आणि त्यांच्या हरकती अगर सूचना सादर करण्यासाठी विहित नमुन्यातील फॉर्म क्र. ४ मधील नोटीस योग्यवेळी बजावण्यात येणार आहेत.

तसेच असे कळविण्यात येत आहे की ज्या मालकांच्या मिळकतीना अगर हक्कांना उक्त प्रारूप नगररचना परियोजना तयार केल्यामुळे अपायकारकरित्या बाधा पोचलेली असेल तर ते महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १०२ मधील तरतुदींप्रमाणे नुकसानभरपाई मिळण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार लवाद यांचेकडे ही जाहीर नोटीस **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसात मागणी करण्यास पात्र राहतील.

**सु. व. सुर्वे,**
लवाद,
नगररचना परियोजना, नैना क्र. १२.

दिनांक ३ ऑक्टोबर २०२४.

# OFFICE OF THE ARBITRATOR,

# TOWN PLANNING SCHEME, NAINA NO. 12

(Chinchavali tarf Vaje, Kondale, Mahalungi, Morbe, Ritghar, Umroli, Usarli Bk. and Vakadi)

NAINA Office, 7th Floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD, Belapur, Navi Mumbai, 400 614

## Public Notice

(Under Rule no.13(*1*) of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974)

No. ARB/TPS-12/GEN/2024/01, Dated 3rd October 2024

Whereas, in the parts of villages mentioned hereinafter situated in Panvel Tahsil of District Raigad, the Draft Town Planning Scheme, NAINA No. 12 (Chinchavali tarf Vaje, Kondale, Mahalungi, Morbe, Ritghar, Umroli, Usarli Bk. and Vakadi) has been sanctioned by the Vice President and Managing Director, CIDCO under sub-section (*2*) of Section 68 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 *vide* his Notification No. CIDCO/NAINA/TPS-12/Draft Scheme/2024/105; dated 8th July 2024 in exercise of the powers delegated to him *vide* Urban Development Department Notification No. TPS-1817/973/CR-103/17/UD-13; dated 13th September 2017. The said notification has been published in the *Maharashtra Government Gazette*, Extra-Ordinary, Part II, dated 9th July 2024;

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development Department has appointed Shri S. V. Surve, Retired Deputy Director of Town Planning as the Arbitrator for the said sanctioned Draft Town Planning Scheme No. 12 *vide* its Notification No. TPS-1224/1343/CR-78/24/TPS-12/US-12, dated 7th August 2024 as provided under sub-section (*1*) of Section 72 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 to carry out his duties as per the said Act;

And Whereas, the Arbitrator is required under Rule No. 13 (*1*) of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974 to publish a notice to inform the owners of the lands included in the said scheme from when he has commenced his duties;

Now, therefore, I, the undersigned as Arbitrator declare by this notice that I have commenced the duties of the Arbitrator in respect of said Town Planning Scheme No. 12 from 3rd October 2024 as provided under Rule No. 13 (*1*) of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974.

All the owners or persons interested in the lands included in this Scheme will be served with special notices in the prescribed Form No. 4 in due course to give hearing and submit their suggestions and objections in respect of the said draft sanctioned Scheme;

Further, it is informed to those whose properties or rights have been injuriously affected by making of this draft Town Planning Scheme can make a claim of compensation with sufficient proofs and reasons before the undersigned as provided under section 102 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 within a period of sixty days from the date of appearing this public notice in the *Maharashtra Government Gazette*.

S. V. SURVE,

Arbitrator,

Town Planning Scheme, NAINA No. 12.

Dated : 3rd October 2024.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.